Suphal Kamgal

महाराष्ट्र शासन

सहाय्यक निबंधक सहकारी संस्था उमरखेड

वसंत नगर उमरखेड ता. उमरखेड जि. यवतमाळ

Email arcs.yml.ukd@gmail.com                दुरध्वनी क्रमांक ०७२३१२३७२६८

क्र.सनिउ/नियमन /कलम ७७ अ/ २०९३/२०१६                दिनांक :- १७ /१२ /२०१६

# महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) अंतर्गत आदेश

**वाचा:-**

**१.महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ)**

**२. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८१**

**३. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८२**

**४. टि.आर.गोळे लेखापरीक्षक, सहकारी संस्था उमरखेड यांचे पत्र .लेप/८९अत/ ५८८/२०१६ दि.२४.१०.२०१६**

**५.श्री ए.डी.भागानगरे सहकारी अधिकारी श्रे-१ यांचा दि.२१.११.२०१६ रोजीचा अहवाल.**

**६. या कार्यालयाचा नोटिस क्र.सनिउ/ नियमन/कलम७७अ/१९४०/२०१६ दि.२२.११.२०१६**

ज्या अर्थी नगरपालिका सफाई कामगार सहकारी संस्था मर्या उमरखेड ही संस्था नोंदणीकृत सहकारी संस्था असून तीचा नोंदणी क्रमांक १२११ हा आहे.आणि संस्थेने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, त्या खालील नियम संस्थेचे उपविधी यानुसार संस्थेच कामकाज चालविणे अपेक्षीत आहे.आणि,

ज्या अर्थी उपरोक्त वाचा क्र.२ नुसार संस्थेने प्रत्येक वित्तीय वर्षात निदान एकदा तरी आपल्या लेख्याचे लेखापरीक्षण करून घेणे आवश्यक असताना संस्थेने लेखापरीक्षण सन २०१५-१६ या वर्षाचे करून घेतले नाही. आणि,

ज्या अर्थी उपरोक्त वाचा क्र.३ नुसार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८१ नुसार लेखापरीक्षकांनी केलेल्या लेखापरीक्षेवरून संस्थेच्या कामकाजात कोणतेही दोष असल्याचे उघडकीस आले तर संस्थेने लेखापरीक्षेच्या अहवालाच्या तारखेपासून तिन महिन्याचे आत लेखापरीक्षपकाने निदर्शनास आलेले दोष किंवा नियम बाह्यता या बाबत निंबधकाकडे स्पष्टीकरण दिले पाहिजे.आपण आपल्या संस्थेचे सन २०१४-१५ चे लेखापरीक्षण दोषदुरूस्ती अहवाल सादर केला नाही. आणि,

ज्या अर्थी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८९ अ अन्वये संस्थेची तपासणी करीता लेखापरीक्षक सहकारी संस्था उमरखेड यांचेकडे कार्यालयाचे आदेश क्र.सनिउ /नियमन /कलम ८९ अ.त.स.सं./२०७/२०१६ नुसार माहे जून २०१६ नुसार तपासणी करण्याचे लक्षांक दिलेले होते.परंतू उपरोक्त वाचा क्र.४ नुसार आपण आपल्या संस्थेचे दप्तर तपासणी करीता अनेक वेळा मागून सुध्दा तपासणी करीता दिलेले नसल्यामुळे त्यांना तपासणी करता आली नसल्याचे त्यांनी या कार्यालयास कळविले आहे. आणि,

ज्या अर्थी उपरोक्त वाचा क्र.५ नुसार या कार्यालयास असे निदर्शनास आले की, आपल्या संस्थेची महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७५ नुसार वार्षीक सर्वसाधारण सभा झाली नसल्याचे , संचालक मंडळाच्या सभा झाल्या नसल्याचे व माहे जानेवारी २०१६ पासून कॅशबूक लिहिले नसल्याचे ,सभा न घेता कर्ज वाटप केल्याचे निदर्शनास आले आहे. आणि,

ज्या अर्थी उपरोक्त प्रमाणे समितीने कार्य केल्याचे बंद करण्याचे बंद केल्यामुळे आपण नगर पालिका सफाई कामगार सहकारी पत संस्था मर्या उमरखेड जि.यवतमाळ या संस्थेचे समिती सदस्य पदावर कायम राहण्यास कोणताही वैधानिक अधिकार नसल्यामुळे व महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (ब-१)मधील तरतूदीनुसार अपात्रता धारण केली आहे. आणि,

**(मागे पहा)**

4

Scanned by CamScanner

ज्याअर्थी ,उपरोक्त वाचा क्र.६ नुसार आपणास नगरपालिका सफाई कामगार सहकारी संस्था मर्या उमरखेड ता.उमरखेड जि.यवतमाळ या संस्थेचे समिती सदस्य पदावर कायम राहण्यास कोणताही वैधानिक अधिकार आपणास राहिलेला नसल्यामुळे सदर संस्थेवर प्राधिकृत अधिकाऱ्याची नियुक्ती का करण्यात येवू नये या बाबत सदर नोटिसच्या तारखेपासून १५ दिवसाचे आत आपले लेखी म्हणणे या कार्यालयास सादर करावे .तसेच दिनांक १३/१२/२०१६ दुपारी १.०० वाजता माझे समक्ष हजर राहून आपले तोंडी / लेखी म्हणणे आवश्यक त्या पुराव्यासह सादर करावे.विहित मुदतीत व तारखेस आपणाकडून लेखी खुलासा प्राप्त न झाल्यास आपणास या बाबतीत काहीही म्हणावयाचे नाही असे गृहित धरण्यात येईल किंवा आपला खुलासा समाधान कारक नसल्यास आपणास संस्थेच्या समिती सदस्य पदावर कायम राहण्यास कोणताही अधिकार राहणार नाही याची जाणीव करुन देण्यात आली होती. परंतु आपण सदर तारखेवर उपस्थित न राहील्यामुळे, आपल्या संस्थेचे पुढील कामकाज सुरळीत चालु ठेवण्यासाठी व महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ (१) (१-अ) (फ) (दोन) चे परंतुकान्वये आपल्या संस्थेवर प्राधिकृत अधिकारी नेमणुक करणे आवश्यक व क्रमप्राप्त झाले असल्याची माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी, मी खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

## -:: आदेश ::-

मी एस.एस.भालेराव सहाय्यक निबंधक सहकारी संस्था उमरखेड , महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ (१) (१-अ) (ब-१) (फ) (दोन) चे परंतुका मधिल तरतुदीनुसार नगरपालिका सफाई कामगार सहकारी संस्था मर्या उमरखेड र.नं.१२११ ता.उमरखेड जि.यवतमाळ या संस्थेचे कामकाज पाहण्यासाठी **श्री. ओ. एम.पहुरकर सहकार अधिकारी श्रेणी-२** अंतर्गत सहाय्यक निबंधक सहकारी संस्था उमरखेड ता. उमरखेड जि.यवतमाळ यांची पुढील ६महिण्यांकरीता सदर संस्थेवर प्राधिकृत अधिकारी म्हणुन नियुक्ती करीत आहे. संस्थेचे प्राधिकृत अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्याखालील नियम १९६१ तसेच संस्थेचे उपविधी व या कार्यालयाने वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार कामकाज करावे.

सदर आदेश आज दि.१७.१२.२०१६ रोजी माझे सही व कार्यालयीन मुद्रेनिशी देण्यात येत आहे.

**(एस.एस.भालेराव)**
**सहाय्यक निबंधक**
**सहकारी संस्था उमरखेड**

**प्रति,**

१. अध्यक्ष/ सचिव, नगरपालिका सफाई कामगार सहकारी संस्था मर्या उमरखेड र.नं.१२११यांना सुचित करण्यात येते की, सदर संस्थेचे श्री.ओ.एम.पहुरकर स.अ.श्रे-२ तथा प्राधिकृत अधिकारी यांना संस्थेचा पदाभार देऊन तसा अनुपालन अहवाल सादर करण्यास रवाना.

२. श्री. ओ.एम.पहुरकर स.अ.श्रे-२ तथा प्राधिकृत अधिकारी नगरपालिका सफाई कामगार सहकारी संस्था मर्या उमरखेड र.नं.१२११ यांना सुचित करण्यात येते की, संस्थेचे /अध्यक्ष सचिव प्राधिकृत अधिकारी पदाचा प्रभार स्विकृत करुन अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

३. श्री टाक अजय जुम्मन, अध्यक्ष तथा संचालक, नगरपालिका सफाई कामगार सहकारी संस्था मर्या उमरखेड र.नं.१२११ यांना माहितीकरीता रवाना.

४. श्री पटोने राजेश रामा, सचिव तथा संचालक, नगरपालिका सफाई कामगार सहकारी संस्था मर्या उमरखेड र.नं.१२११ यांना माहितीकरीता रवाना.

५. श्री पटोने कैलास श्रीकिसन संचालक, नगरपालिका सफाई कामगार सहकारी संस्था मर्या उमरखेड र.नं.१२११ यांना माहितीकरीता रवाना.



Scanned by CamScanner

aphai kamgar

६. श्री मेहता अमित सुरेश संचालक, नगरपालिका सफाई कामगार सहकारी संस्था मर्या उमरखेड र.नं.१२११ यांना माहितीकरीता रवाना.
७. श्रीमती टाक सुनिता संजय संचालक, नगरपालिका सफाई कामगार सहकारी संस्था मर्या उमरखेड र.नं.१२११ यांना माहितीकरीता रवाना.
८. श्री टाक संजय रामा संचालक, नगरपालिका सफाई कामगार सहकारी संस्था मर्या उमरखेड र.नं.१२११ यांना माहितीकरीता रवाना.
९. श्रीमती गोयल कमला मोतीलाल संचालक, नगरपालिका सफाई कामगार सहकारी संस्था मर्या उमरखेड र.नं.१२११ यांना माहितीकरीता रवाना.
१०. श्री पटोने अनिल रामा संचालक, नगरपालिका सफाई कामगार सहकारी संस्था मर्या उमरखेड र.नं.१२११ यांना माहितीकरीता रवाना.

उपरोक्त सर्व संस्थेचे अध्यक्ष व संचालक नगरपालिका सफाई कामगार सहकारी संस्था मर्या उमरखेड र.नं.१२११ यांना पदमुक्त करण्यात येत आहे.

११. मुख्य कार्यकारी संचालक , जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅक लि. यवतमाळ यांना माहितीकरीता रवाना.
१२. शाखा व्यवस्थापक , जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅक शाखा उमरखेड ता.उमरखेड जि.यवतमाळ यांना माहितीकरीता रवाना.

**प्रतिलीपी सादरः-**

१. मा.सचिव, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण , महाराष्ट्र राज्य पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर
२. मा.जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यवतमाळ यांना माहितीस्तव सविनय सादर.
३. मा. जिल्हा विशेष लेखापरिक्षक वर्ग-१ सहकारी संस्था यवतमाळ यांना माहितीस्तव सविनय सादर .

(एस.एस. भालेराव)
सहाय्यक निबंधक
सहकारी संस्था उमरखेड

Scanned by CamScanner